# ॲलार्ड प्राइझ-विभूषित, पद्मविभूषण श्री. अण्णा हजारे

संपूर्ण भारतभर भ्रष्टाचारविरोधी अहिंसक, गांधी-मार्गी चळवळ सुरू करून त्यायोगे गेली चार दशके जन-आंदोलन यशस्वी करून दाखवणारे जागतिक कीर्तीचे समाजसुधारक, पद्मश्री, पद्मविभूषण वगैरे राष्ट्रीय पुरस्कारांनी संमानित झालेले श्री. अण्णा हजारे अचानक नुकतेच चार दिवस व्हँकूव्हरमधे आले, आणि २५ सप्टेंबर, २०१३ या दिवशी, युनिव्हर्सिटी ऑफ ब्रिटिश कोलंबिया येथे नव्याने निर्माण झालेले आंतरराष्ट्रीय स्तरावरील ॲलार्ड प्राइझ मिळवून लगेच दुसऱ्या दिवशी इथून गेलेदेखील. त्या दिवसात योगायोगाने आम्हा काहीजणांना या महामानवाच्या जवळून भेटीचा योग आला.

ऑक्टोबर २०१२ मधे युबीसीच्या लॉ फॅकल्टीमधील माजी विद्यार्थी श्री. पीटर ॲलार्ड यांनी जागतिक स्तरावर भ्रष्ट्राचार, लाचलुचपत यांच्या विरोधात जे काम करतात, असे लोक किंवा संस्था यांना देण्यासाठी एक पुरस्कार निर्माण केला. Allard Prize for International Integrity. या पुरस्काराचे हे पहिलेच वितरण होते. जवळपास शंभराहून अधिक लोक आणि संस्था यांची नावे अट्ठेचाळीस देशांमधून त्यासाठी आलेली होती, त्यातून शेवटचे तीन मानकरी निवडले गेले होते, त्यात अफगाणिस्तानमधील स्त्रियांच्या हक्कांसाठी झगडणारी, डॉ. सिमा समार ही एक बाई, आणि एक ग्लोबल विट्नेस् नामक संस्था, जी जागतिक पर्यावरणसंबंधी संघर्ष आणि त्यात घडणारा भ्रष्टाचार यांविरोधी लढा देते, अशी दोन बाकी नावे होती. या दोघांना प्रत्येकी २५ हजार डॉलर्सचा पुरस्कार जाहीर झाला, आणि श्री. अण्णा हजारे यांना प्रथम पुरस्कार १००, ००० डॉलर्सचा मिळाला. हा जागतिक पुरस्कार प्रथम वर्षी मिळवणारी व्यक्ती आपल्या महाराष्ट्रातील एक चोख आणि प्रामाणिक समाजसुधारक आहे, याचा अर्थातच आपल्या सर्वांना अभिमान आहे. पण अण्णांशी प्रत्यक्ष भेटणे, आणि त्यांचे बोलणे ऐकणे, त्यांच्याजवळ बसून त्यांना निरखणे हा संपूर्ण अनुभव खास स्फूर्तिदायक होता. अण्णांसोबत त्यांचे सचिव श्री. प्रदीपभाई मुनोत हे होते, ते म्हणाले, की कोणताही पुरस्कार मिळाल्यावर अण्णांचे नेहमीचे उद्‌गार असतात, “न खात्या देवाला नैवेद्य!” अण्णांनी आम्हाला सांगितले, की आत्तापर्यंत मिळालेल्या सर्व पुरस्कारांच्या रकमांचा त्यांनी एक विश्वस्त-निधी (ट्रस्ट) निर्माण केला आहे, कारण त्यांचं स्वत:चं बँकेत खातं, किंवा बँक-बॅलन्स नाही. राळेगण सिद्धी या पुण्याजवळच्या खेड्यातल्या एका देवळात या अण्णांची जी खोली आहे, तिच्यात झोपायला एक खाट, खायला एक थाळी, काही कपडे आणि काही पुस्तके यांपलिकडे सामानसुमान खास काही नसते असे प्रदीपभाई म्हणाले. नव्या ॲलार्ड पुरस्काराची सर्वच्या सर्व रक्कम त्यांनी स्वामी विवेकानंदांच्या नावाच्या लोक-निधीसाठी देऊन टाकली, म्हणजे त्याचा उपयोग सामान्य जनतेच्या संवर्धन-संगोपनासाठी, दु:खनिवारणासाठीच केला जाईल असे अण्णा म्हणाले. निस्पृहपणा आणि स्वत:पुरता अपरिग्रह यांचे अण्णा हे मूर्तिमंत उदाहरण आहे.

या पुरस्कार-समारंभासाठी व्हँकूव्हरमधे आलेले अण्णा हजारे डाउनटाउनमधील ज्या एका हॉटेलमधे उतरले होते, तिथे त्यांना भेटायला आम्हाला २५ तारखेला सकाळी पंधरा मिनटं प्रदीपभाईंच्यामुळे लाभली, त्यासाठी धावतपळत आम्ही पाचसहा जण गेलो. त्याआधी सुषमाच्या स्थानिक रेडिओ-स्टेशनवर त्यांची मुलाखत चाललेली होती. त्या संध्याकाळच्या पुरस्कार-समारंभासाठी फक्त युबीसीत असलेले दोनतीन विद्यार्थीच उपस्थित राहू शकले. पण त्यानंतर दुसऱ्या दिवशी मात्र डॉ. विनय चासकर, अतुल परळकर वगैरेंनी विनंती केल्यामुळे सकाळी साडेदहा ते बारापर्यंत अण्णा हजारे आणि त्यांचेसोबत आलेले सचिव श्री. मुनोत यांनी मराठी माणसांना अनौपचारिक भेटायला वेळ दिला.

परळकरांच्या घरी त्यांना अतुलने गाडीत घालून आणले. तिथे येऊ शकलेल्या वीस-पंचवीस मराठी लोकांना त्यांच्याशी संवाद साधता आला. आमच्या प्रश्नांना त्यांनी खूप व्यवस्थित उत्तरे दिली.

स्वत:ची चोख आणि प्रामाणिक वर्तणूक, राळेगण सिद्धी या स्वत:च्या परंपराप्राप्त खेड्याचा संपूर्ण कायापालट, पाण्याच्या अभावापासून सुरुवात करून शेतीचा विलक्षण विस्तार आणि उत्पादन वाढवून दाखवणे, त्या गावात मादक पदार्थ, दारू, सिगरेट, विडी, तंबाखू वगैरेंच्या विक्रीला बंदी घालून ती ३५ वर्षे यशस्वीपणे चालवून दाखवणे, सत्तेवरील पुढारी, किंवा कोणत्याही स्थानावरील लब्ध-प्रतिष्ठित सत्ताधीश, यांच्या भ्रष्ट्राचाराविरुद्ध सतत टीकेची, निषेधाची धार धरून वैध मार्गांनी कायद्यात बदल घडवून आणणे, लोकांना त्यांच्या लोकशाहीतील हक्कांची नीट जाणीव करून देणे, (माहिती-अधिकाराचा कायदा,) कोणत्याही राजकीय पक्षाला पाठिंबा न देणे, लोकपाल विधेयक आणण्यासाठी गांधी-मार्गी अहिंसक चळवळ, कायद्यात बदल घडवून आणण्यासाठी बेमुदत उपोषण करणे वगैरे अण्णांची समाजसेवा आपल्याला ऐकून माहिती असतेच. संपूर्ण भारतीय जन-मानसात आपल्या सद्वर्तन आणि सद्भावनांमुळे एक अढळपद प्राप्त करून घेऊन, त्याचा उपयोग सत्तेसाठी अजिबात न करतां, केवळ सामान्य माणसाच्या जीवनात खरोखरीच्या सुधारणा आणण्यासाठी करणे हे त्यांचे यश खरोखर विलक्षण भारून टाकणारे आहे. पंचाहत्तरीचा हा साधासुधा, खादीच्या कपड्यातला, गांधी टोपी घालणारा, काळासावळा हंसरा माणूस बोलू लागला की त्याच्या शब्दाशब्दातला नेमकेपणा, सच्चेपणा, आणि कळकळ ऐकणाऱ्याला जिंकतेच.

“नापसंतीचा हक्क” ( right to reject ) हे विधेयक भारतातील निवडणुकांतील भ्रष्टाचार थांबवण्यासाठी आणणे, हे त्यांचे अलिकडचे काम चालू आहे असे कळले. म्हणजे जर निवडणुकीला पक्षांनी भरपूर पैसे खर्च करून (जनतेला खिरापत वाटून) उभे केलेले एकूणएक उमेदवार चोर असले, आणि जर एकालाही मत द्यावेसे आपल्याला वाटत नसले, तर मतदारास नापसंतीचा शिक्का सर्व उमेदवारांवर ठोकतां यायला हवा. म्हणजे जर का असे नापसंतीचे शिक्के पडलेली मते कोणत्याही उमेदवाराला मिळालेल्या मतांहून अधिक टक्के असतील, तर मग ती निवडणूकच रद्द ठरवावी लागेल, आणि या निवडणुकीत रद्द ठरलेल्या एकाही उमेदवारास पुढच्या पुन्हा घेतल्या जाणाऱ्या निवडणुकीत उभे राहतां येणार नाही. याने काय घडेल? असे विचारल्यावर अण्णा म्हणाले, की पाण्यासारखा पैसा खर्च करून जे पक्ष नालायक उमेदवारांना मारूनमुटकून उभे करतात, त्यांचे पैसे निवडणूक रद्द होऊन पाण्यात गेले, की त्यांचे डोळे उघडतील, आणि ही पक्षाने निवडणूक लढवण्याची घटनाबाह्य पद्धत हळूहळू बदलेल. सध्या निवडणुकीत जेमतेम पन्नास टक्के लोकच मतदान करतात, आणि त्यातही ज्याला २२ टक्के मते जेमतेम पडतात, असले लोक सत्तेवर येऊन शंभर टक्के लोकांवर सत्ता गाजवतात, ही कसली लोकशाही? हे फक्त पक्षांचे राजकारण आहे. यापेक्षा खरा चारित्र्यवान जो कोणी असेल, (असे चारित्र्यवान लोक अजुनी भारतात आहेत), त्याला लोकांनी बहुमताने निवडून (पक्षाने पैसे देऊन/घेऊन नव्हे,) निवडणुकीस उभा करावा, आणि खरोखरीची जास्तीत जास्त मते ज्याला पडतील, अशा चारित्र्यवान माणसाला संपूर्ण भारताचे निर्णय घेण्याची संधी मिळायला हवी, असे त्यांनी आम्हाला ऐकवले. निवडणुकी खऱ्या लोकशाही मार्गाने व्हाव्या यासाठी हे विधेयक यावे असा त्यांचा भरघोस प्रयत्न चालू आहे, असे कळले.

भ्रष्टाचार संपूर्ण संपणार नाही, पण आपण जी विधेयके आणतो आहोत, त्यांचा नीट वापर झाला, तर निदान त्याला मोठ्या प्रमाणात आळा तरी बसेल, आणि भारताची प्रगती खरोखरी सर्व भारतीयांसाठी उपलब्ध तरी होईल, असे त्यांचे प्रामाणिक आणि व्यावहारिक मत ऐकतां आले. आमच्याकडून आपल्या

कार्याला काय मदत होऊ शकेल? असा प्रश्न त्यांना विचारला, तेव्हा ते म्हणाले, की “आमच्याबरोबर मनाने राहा. तुमची धन-दौलत आम्हाला नकोय, पण तांत्रिक गोष्टींच्या तुमच्या ज्ञानामधून या आपल्या कार्याबद्दल जर सगळ्या लोकांना तुम्हाला कळवतां आले, तर ती मदत मोठी ठरेल.”

अर्धा तास सर्वांचे प्रश्न ऐकून, आपली मतें आम्हाला ऐकवून, मग अण्णांनी परळकरांकडे खास मराठमोळ्या खाण्याचा समाचार घेतला. ज्वारीच्या, बाजरीच्या पिठाच्या भाकऱ्या आणि पिठलं, काकडीची कोशिंबीर असल्या आम्ही घाईघाईने केलेल्या खाण्यावर ते खूष झाले. “माहेरपणाला आलेल्या मुलीला जसा आनंद होतो, तसा मला तुमच्यामुळे आनंद मिळाला” या शब्दांनी त्यांनी आम्हा सर्वांना सुखवले. त्यांच्यासोबत फोटो काढून घेण्याच्या अनेकांच्या हौशीला त्यांनी न कंटाळतां तोंड दिले. आणि आमच्या सर्वांच्या मनापासूनच्या शुभेच्छांचे गाठोडे घेऊन, अण्णा भारताच्या दिशेने परतले.

-विद्युल्लेखा अकलूजकर